# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 26 February 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध, मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन
- राज्य डेटा प्राधिकरणाची स्थापना, तसंच परळी इथं नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाची मंजूरी
- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय
- प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्याचा आज महाशिवरात्रीच्या पर्वावर समारोप

  आणि

- प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एक हजार ८९५ प्रकल्पांना मंजुरी-सलग तिसऱ्या वर्षी देशात अव्वल

आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून, सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून समतोल विकास साधला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. सामाजिक दायित्व निधीतून आदिवासी समाजाच्या विकासासंदर्भात काल मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या परिषदेत ते बोलत होते. आदिवासी मुलांना योग्य संधी मिळण्याची गरज फडणवीस यांनी व्यक्त केली. ते म्हणाले...

***जर आदिवासी मुलं योग्य प्रकारे शिकली, तर अनेक अडचणीतनं ते बाहेर येतात. साधारणपणे आपण जर बघितलं तर आदिवासी मुलांमध्ये उपजत प्रचंड मोठे गुण आहेत. केवळ त्या गुणांना योग्य प्लॅटफॉर्म देण्याची आवश्यकता असते. आणि म्हणूनच आपल्या सगळ्या आदिवासी शाळा असतील, आश्रमशाळा असतील, नामांकित प्रायव्हेट स्कुल्समध्ये देखील आदिवासी मुलांना आपण शिकवलं पाहिजे. कारण, जोपर्यंत समाजातल्या इतर लोकांसोबत त्यांचं एज्युकेशन होणार नाही, तोपर्यंत बुजरेपणाचा गुण तेव्हाच जाऊ शकतो, जेव्हा हा समाज सगळा किंवा ही मुलं इतरांसोबत मिक्सअप होतील.***

****

पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबवण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत काल घेण्यात आला. १९७६ पूर्वीच्या बाधित गावठाणांसाठी हा कृती कार्यक्रम राबवण्यात येईल.

राज्य आधारसामग्री –डेटा धोरणास मंजुरीसह, राज्य डेटा प्राधिकरणाची स्थापना करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला आहे. महाराष्ट्र महामार्ग अधिनियमात सुधारणा, आणि महाराष्ट्र महामार्ग अध्यादेश २०२५ ला ही, या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पुणे जिल्ह्यात बारामती इथं तसंच बीड जिल्ह्यात परळी इथं नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यालाही कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. यासाठी प्रत्येकी ५६४ कोटी ५८ लाख रुपये तरतुदीलाही मंजुरी देण्यात आली.

दरम्यान, परळीत पशुवैद्यक महाविद्यालय स्थापनेच्या निर्णयाबद्दल अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. प्रगतीच्या वाटेवर हे एक विश्वासात्मक पाऊल ठरेल, असं मुंडे यांनी सामाजिक संपर्क माध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे.

****

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ करण्यात आली आहे. आता राज्य सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ५३ टक्के महागाई भत्ता मिळेल. एक जुलै २०२४ पासून ही दरवाढ लागू होईल, जानेवारीपर्यंतची थकबाकी या महिन्यातल्या वेतनासह दिली जाणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्यशासनाने यावर्षीपासून छत्रपती संभाजी महाराज महाराष्ट्र प्रेरणा गीत पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी फ्रान्समध्ये मार्सेलिस इथं ही घोषणा केली. पहिला प्रेरणा गीताचा पुरस्कार स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या `अनादी मी, अनंत मी` या गीताला देत असल्याचंही शेलार यांनी जाहीर केलं.

****

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं गंगा-यमुना आणि गुप्त सरस्वतीच्या पवित्र संगमावर सुरु असलेल्या, महाकुंभमेळ्याचा आज महाशिवरात्रीला समारोप होत आहे. १४४ वर्षांनी येणाऱ्या या महापर्वात अमृतस्नान करण्याचा आज शेवटचा दिवस असल्यानं, स्थानिक प्रशासनानं चोख व्यवस्थापन केलं आहे. महाकुंभमेळ्याचा सुरळीत समारोप होण्यासाठी अधिकाऱ्यांनी मेळा परिसरात आणि प्रयागराजमध्ये "नो व्हेईकल झोन" लागू केला आहे. १३ जानेवारी रोजी सुरू झालेल्या महाकुंभमेळ्यात आतापर्यंत ६४ कोटी ६० लाखांहून अधिक भाविकांनी पवित्र स्नान केलं.

दरम्यान, महाशिवरात्रीनिमित्त मराठवाड्यात वेरुळ इथलं घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग, परळी इथं वैद्यनात तसंच औंढा इथल्या नागनाथ मंदिरातही भाविकांसाठी मंदिर व्यवस्थापनानं विविध सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर महसुली विभागात एक दिवस गावकऱ्यांसोबत हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या उपक्रमात गावातल्या शक्य त्या समस्या जागेवरच सोडवण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असेल, असं गावडे यांनी सांगितलं. ते म्हणाले...

***लोकांचे जागेवर सुटणारे प्रश्न जागेवर सोडवू. ज्याला थोडा वेळ लागणार आहे, त्याच्यावर जे काही कामकाज करावं लागतं, ते कामकाज करून आम्ही नागरिकांचे प्रश्न सोडवण्यावर भर देण्यासाठी खासकरून रचनात्मक पद्धतीनं ही एक योजना राबवण्याचं नियोजित केलेलं आहे. आणि पहिल्या एक दोन आठवड्यामध्ये आम्हाला कशा प्रकारे प्रतिसाद मिळतो आहे, त्याचा अनुभव घेऊन आणि जसे जसे आम्हाला करेक्टीव्ह मेजर्स घ्यावे लागतील काही सुधारणात्मक गोष्टी त्याच्यामध्ये इंप्रुव्ह कराव्या लागतील, इन्क्लुड कराव्या लागतील त्या आम्ही निश्चितपणाने करू.***

****

प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत महाराष्ट्रात, सर्वाधिक २२ हजार १० प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे, यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या एक हजार ८९५ प्रकल्पांचा समावेश आहे. महाराष्ट्रात हा प्रकल्प मंजुरीचा उच्चांक असून, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने सलग तीन वर्षांपासून हे सातत्य राखल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांनी दिली, ते म्हणाले...

***आपल्याकडे खूप वेगवेगळ्या स्वरूपाचे प्रकल्प या योजनेतून उभे राहिलेले आहेत. उदाहरणादाखल भाजीपाल्याचे सोलार ड्राईड करण्याचे अनेक प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने उभे राहिलेले आहेत. तसेच एस फॉर एस नावाची एक बायबॅक करणारी स्टार्ट अप आहे. ती कंपनी पूर्ण त्यांचा सोलार ड्राईड भाजीपाला बायबॅक करते. मसाल्याचे उद्योग आपल्याकडे खूप चांगल्या पद्धतीने सुरू झालेले आहेत. दुधावर प्रक्रिया करणारे उद्योग आपल्याकडे खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. मला सांगायला अतिशय आनंद***

***होतो की या योजनेमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा मागच्या तीन वर्षांपासून सातत्यानं देशात नंबर एकवर आहे.***

****

देशभरात आठवी आर्थिक गणना करण्यात येणार आहे. यासंदर्भात छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक काल पार पडली, या गणनेसाठी ग्रामीण भागासाठी सुमारे साडे सहा हजारावर तर शहरी भागासाठी सुमारे साडे पाच हजारावर प्रगणकांची नेमणूक केली जाणार असून, यासाठी विशेषत्वाने तयार केलेल्या मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे ही गणना होणार आहे.

***देशात पहिली आर्थिक गणना १९७७ मध्ये झाली होती. तर २०१९ साली सातवी आर्थिक गणना झाली होती. अर्थव्यवस्थेच्या संरचनेचं मूल्यांकन करणं म्हणजे, बिगरशेती उत्पादन तसंच वस्तू आणि सेवांच्या वितरणात असलेल्या आस्थापनांची संख्या, आणि त्यात गुंतलेल्या व्यक्तींची माहिती संकलित करणं तसंच अद्ययावत करणं, हा या आर्थिक गणनेमागचा उद्देश असतो. काळानुसार आर्थिक परिदृष्यातील बदलांचं निरीक्षण करणं, केंद्र, आणि राज्य सरकारी धोरणांच्या प्रभावाचं मूल्यांकन करणं, तांत्रिक प्रगती तसंच बाह्य आर्थिक घटकांचा प्रभाव अभ्यासणं अशा विविध उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ही आर्थिक गणना केली जाते.***

****

बिटकॉईन क्रिप्टोकरन्सी घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग– सीबीआयने काल देशभरात ६०हून अधिक ठिकाणी छापे घातले. यामध्ये पुणे, कोल्हापूर, आणि नांदेडचा समावेश आहे. गेन बिटकॉईन नावाने ही कंपनी २०१५ मध्ये सुरू झाली होती. या कंपनीने १८ महिन्यांसाठी दरमहा १० टक्के दराने परतावा देण्याचं आश्वासन दिलं होतं. २०१७मध्ये या कंपनीचा घोटाळा उघड झाला होता. त्यानंतर या कंपनीविरोधात देशभरात तक्रारी दाखल झाल्या होत्या.

****

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती देण्याबाबतचा अंतिम निकाल नाशिक जिल्हा न्यायालयानं शनिवारपर्यंत राखून ठेवला आहे. याप्रकरणी काल सुनावणी झाली. मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार कोट्यातली सदनिका मिळवण्यासाठी खोटं प्रतिज्ञापत्र दिल्याप्रकरणी न्यायालयानं कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावली आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करावी आणि फरार कृष्णा आंधळेला तत्काळ अटक करावी या मागणीसाठी ग्रामस्थांनी काल दोन दिवसांच्या अन्नत्याग आंदोलनाला सुरूवात केली. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

****

नांदेड इथं काल २१ व्या संगीत शंकर दरबार कार्यक्रमाचं उद्घाटन सतार वादक, पद्मभूषण पंडित बुधादित्य मुखर्जी यांच्या हस्ते झालं. यावेळी सुप्रसिद्ध गायिका अनुराधा नांदेडकर यांना यावर्षीच्या 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. काल या कार्यक्रमात साधना सरगम यांच्या संगीत रजनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. खासदार अशोक चव्हाण, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, यावेळी उपस्थित होते.

****

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने परभणी इथं शून्य ते १८ वर्षे वयोगटातल्या ४३८ बालरुग्णांची हृदयरोग तपासणी करण्यात आली. यापैकी ९७ बालकांवर शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असल्याचं तपासणी अंती आढळून आलं. गरजू बालकांवर आर.पी रुग्णालयात नामवंत हृदयरोग तज्ज्ञांकडून उपचार तसंच शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

****

****

दक्षिण मध्य रेल्वेकडून बीदर ते हजरत निझामुद्दीन दरम्यान विशेष गाडीची एक फेरी करण्यात येणार आहे. ही विशेष गाडी बीदरहून आज सकाळी निघाली असून, परतीच्या प्रवासात ही गाडी दिल्लीहून एक मार्चला सकाळी पावणे आठ वाजता सुटेल.

****